



*अर्थसंकल्प २०२५-२६*

**रुपया येतो कोठून** *(पैशात)*




*अर्थसंकल्प २०२५-२६*

**रुपया जातो कोठे** *(पैशात)*




# महाराष्ट्र शासन
# अर्थसंकल्प २०२५-२६

## सर्वसाधारण चर्चा

## समर्थन अर्थसंकल्प अध्ययन केंद्र


१०५ लोटस हाऊस, लिबर्टी सिनेमाच्या बाजूला, बॉम्बे हॉस्पिटल जवळ, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग, मरीन लाईन्स (पू.) मुंबई- ४०० ०२० ☎०२२-२२००३०६०

✉: samarthanmumbai97@gmail.com www.samarthanadvocacy.org

**समर्थन**

संस्थापक अध्यक्ष : **स्व. सदानंद वर्दे**

संस्थापक : **श्री. विवेक पंडित**

अध्यक्ष : **अॅड.(डॉ.) अशोक येंडे**

उपाध्यक्ष: **श्री.आशिष कुलकर्णी**

कार्याध्यक्ष: **श्री. संतोष पाटील**

सचिव: **डॉ. आशिष भोसले**


संपादन :**मुक्ता भारती व हिंदप्रभा कर्वे**

विश्लेषण आणि संकलन:
**रुपेश कीर** -९८९२९३९६१७

विशेष सहाय्य :
**स्नेहा घरत, विलास सुवरे,**
**निलम काकड, उमेश सांगळेव राजश्री कदम**


**नोंदणी क्रमांक:**

पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन क्र.एफ -१८९०३, मुंबई

सोसायटी रजिस्ट्रेशन क्र. एम. एस. मुंबई
१५६७/९६ जीबीबीएसडी



प्रकाशक (पत्रव्यवहार):
१०५, लोटस हाऊस, लिबर्टी सिनेमाच्या बाजूला,
बॉम्बे हॉस्पिटल जवळ, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग,
मरिन लाईन्स (पू), मुंबई -४०० ०२०
☏०२२-२२००३०६०

Email:samarthanmumbai97@gmail.com

website: www.samarthanadvocacy.org


# लोकशाही बळकट करण्याकरिता उपेक्षितांचे 'समर्थन'

## समर्थन विषयी थोडेसे

धोरणात्मक प्रश्नांवर राज्यातील विविध उपेक्षित समाजघटक व धोरणकर्ते यांच्यामधील दुवा म्हणजे 'समर्थन'. राज्याच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये उपेक्षितांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबीत व्हाव्यात, त्यासाठी लोकशाही यंत्रणा अधिक लोकाभिमुख व्हाव्यात हा समर्थनचा उद्देश. समर्थन उपेक्षितांच्या न्याय्य हक्कांचे, त्यांच्या संघर्षाचे.

**'समर्थन'च्या कामाचे विविध स्तर**

◊ ग्रामीण संघटनांकडून व ग्रामीण पत्रकारांकडून येणारे लोकांचे प्रश्न समजून घेणे.

◊ प्रश्नांना राज्यस्तरावर प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्धी देणे.

◊ प्रश्नांवर विविध स्तरांवर चर्चा घडवून आणणे.

◊ विधिमंडळ सदस्यांपर्यंत प्रश्न पोहोचविणे.

◊ राज्य स्तरावर विविध लोकशाही यंत्रणांकडे, प्रशासनाकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे.

◊ आवश्यक असल्यास न्याययंत्रणेकडे दाद मागणे.

◊ ग्रामीण कार्यकर्ते व ग्रामीण पत्रकारांच्या क्षमता व कौशल्ये वाढावित यासाठी प्रशिक्षण देणे.

◊ लोकशाही यंत्रणेबाबतची माहिती प्रसारित करणे.

◊ अर्थसंकल्पासह राज्याच्या महत्त्वाच्या धोरणांचे विश्लेषण करणे.

# अर्थसंकल्पाची ठळक वैशिष्ट्ये

- दि. १० मार्च २०२५ रोजी राज्याचा २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला. **सन २०२५ २६-चा अर्थसंकल्प वित्त विषयक विवरण पत्रात दिल्या प्रमाणे ७ लाख ५७ हजार ५७५ कोटी ९५ लाख रुपयांचा असून आधीच्या वर्षाच्या सन २०२ २५-च्या अर्थसंकल्पाच्या सुधारित अंदाजाशी तुलना करता तो २८ हजार ३०० कोटी ४२ लाख रुपयांनी अधिक आहे. तर**
- वित्तमंत्र्यांनी सन २०२५-२६ साठी अर्थसंकल्पात ७ लाख २० कोटी रुपयांची तरतूद करीत असल्याचे म्हटले आहे.
- सन २०२५ २६-साठी महाराष्ट्राचे सकल राज्य देशांतर्गत उत्पन्न (GSDP) ४९ लाख ३९ हजार ३५५ कोटी रुपये असण्याचा अंदाज असून तो **सन २०२४२५- च्या तुलनेत ८.२६ टक्के वाढ होणे अपेक्षित आहे .**
- **सन २०२५-२६ मध्ये महसुली खर्च (कर्ज परतफेड वगळून) ६ लाख ६ हजार ८५५ कोटी रुपयांचा अंदाज आहे.** जो २०२४-२५ च्या सुधारित अंदाजापेक्षा ७.२३ टक्क्याने अधिक आहे. शिवाय **राज्याकडून १ लाख ३५ हजार ७८३ कोटी ३४ लाख रुपयांचे कर्ज फेडण्यात येणार आहे.**
- सन २०२४-२५ साठी एकूण महसुली जमा (कर्ज वगळून) ५ लाख ६० हजार ९६४ कोटी रुपये असण्याचा अंदाज आहे. सन २०२४-२५ च्या सुधारित अंदाजाच्या तुलनेत ४.३७ टक्के वाढ अपेक्षित आहे.
- सन २०२५-२६ मध्ये महसुली जमा ५ लाख ६० हजार ९६४ कोटी रुपये इतकी असून महसुली खर्च ६ लाख ६ हजार ८५५ कोटी रुपये इतका होणार आहे त्यामुळे **महसुली तूट ४५ हजार ८९१ कोटी**

**इतकी अंदाजित असून सन २०२४-२५ मध्ये २६ हजार ५३५ कोटी तूट असण्याचे सुधारित आंदज आहेत.**

- **सन २०२३-२४ मध्ये १३ हजार ७५४ कोटी रुपयांची तूट आली आहे.**
- **सन २०२५-२६ मधील राज्यावरील कर्ज व दायित्व ९ लाख ३२ हजार २४२ कोटी रुपयांचे असून अर्थसंकल्पीय तूट ४५१ कोटी २८ लाख इतकी असून राजकोशीय तूट १ लाख ३६ हजार २३४ कोटी ३२ लाख रुपयांची येणार असल्याचे अंदाज आहेत.**
- **सन २०२३-२४ मध्ये ९० हजार ५५९ कोटी ३५ लाख रुपयांची राजकोशीय तूट आली आहे.**
- सन २०२५-२६ मध्ये एकूण महसुली खर्च ६ लाख ६ हजार ८५४ कोटी ६८ लाख रुपये केला जाणार असून त्यापैकी वेतन, निवृत्ती वेतन व व्याज मिळून **३ लाख १२ हजार ५५६ कोटी रुपयांचा बांधील खर्च असून त्याचे एकूण महसुली खर्चातील प्रमाण ५१.५० टक्के इतके मोठे आहे.**
- **सन २०२५-२६ मध्ये एकूण महसुली जमा ५ लाख ६० हजार ९६४ कोटी रुपये असून याच वर्षी राज्यावरील एकूण कर्ज ९ लाख ३२ हजार २४२ कोटी रुपयांचे असून त्याचे महसुली जमेशी प्रमाण १६६.१९ टक्के इतके आहे.**
- **सन २०२५-२६ मध्ये प्रचलित किमतीनुसार ४९ लाख ३९ हजार ३५५ कोटींचे स्थूल राज्य उत्पन्न आहे. त्या तुलनेत राज्यावर ९ लाख ३२ हजार २४२ कोटी रुपयांचे कर्ज असून त्याचे प्रमाण १८.८७ टक्के इतके मोठ आहे.** ते आर्थिक शिस्तीनुसार २५ टक्क्यांच्या मर्यादेत राखणे गरजेचे आहे.
- **सन २०२४-२५ च्या पूर्व अनुमानानुसार राज्य अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर ७.३ टक्के तर भारतीय अर्थव्यवस्थेचा वाढीचा दर ६.५ टक्के अपेक्षित असून राज्य अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर भारतीय अर्थव्यवस्थेच्या तुलनेत ०.८ टक्क्यांनी अधिक राहणार आहे.**

- राज्य शासनाचा मागील १ वर्ष ते १० वर्ष या कालावधीतील १ लाख ४३ हजार ६० कोटी ९० लाख इतका कर महसूल वसूल करण्यात शासनाला अपयश आलेले असून महसुली जमेच्या तुलनेत ही रक्कम २५.५० टक्के इतकी मोठी आहे.
- राज्य शासनाचा करेतर महसूल ज्याचा कालावधी मागील १ वर्ष ते ५ वर्ष व त्यापेक्षा ही अधिक आहे. त्याची थकबाकी २२ हजार ७४६ कोटी ९० लाख रुपये वसूल करण्यात अपयश आले असून महसुली जमेच्या तुलनेत ही रक्कम ४.५ टक्के इतकी आहे.

**वेतन, निवृत्ती वेतन, व्याज यासारख्या बांधील खर्चामध्ये सातत्याने वाढ होत असून त्यामुळे महसुली तूट वाढत आहे. याचाच परिमाण होऊन भांडवली खर्चात आवश्यक त्या प्रमाणात वाढ करता येत नाही, हि चिंतेची बाब झाली आहे. करामध्ये अथवा करेतर महसुलामध्ये वाढ करण्यास असलेल्या मर्यादा विचारात घेता राज्यामुळे गुंतवणुकीस सुयोग्य वातावरण निर्माण करणे, अनुत्पादक खर्चास आळा घालणे, हाती घेतलेले प्रकल्प वेळेत पूर्ण करणे गरजेचे आहे. नंदुरबार, वंशीम बुलढाणा यासारख्या मागास जिल्ह्यांना आउद्योगीक वाढीत प्राधान्य देणे गरजेचे आहे मात्र ते होताना दिसत नाही. मुंबई, ठाणे पुणे यासारख्या जिल्ह्यामध्ये विकासाचा वेग मर्यादित राहिलेला आहे. सद्या महाराष्ट्राचे चित्र आहे.**

# महाराष्ट्राची आर्थिक पाहणी२०२४-२५ मधील ठळक वैशिष्ट्ये

## *लोकसंख्या आणि राज्या पुढील आव्हाने:*

- सन २०२५ नुसार महाराष्ट्राची प्रक्षेपित लोकसंख्या १२ कोटी ८३ लाख इतकी आहे. त्यापैकी पुरुषांची संख्या ६ कोटी ६८ लाख (५२.०७) इतकी असून स्त्रियांची संख्या ६ कोटी १५ लाख (४७.९३) इतकी आहे.
- **सन २०२६ पर्यंत राज्यातील काम करण्यासाठी लायक असणाऱ्यांची (१५-५९ वर्षे वयोगटातील) लोकसंख्या ८ कोटी ७० लाख अपेक्षित आहे. त्यामुळे रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण करणे हे सरकार पुढील मोठे आव्हान राहणार आहे.**
- सन २०२६ मध्ये राज्याच्या एकूण १२ कोटी ९३ लाख लोसंख्येच्या तुलनेत (० ते १४ वयोगटातील) १९.५६ टक्के व (६० व त्यापेक्षा जास्त वयोगटातील) १३.१४ टक्के असे **४ कोटी २३ लाख (३२.७१ टक्के) लोकसंख्या उदरनिर्वाहासाठी इतर व्यक्तींवर अवलंबून असणार आहे.**
- सन २०११-१५ मध्ये **लोकसंख्या वाढीचा दर** ११ टक्के होता तो, **२०२१-२५ मध्ये कमी होऊन ७.७ टक्क्यांवर आला आहे.**
- सन २०११-१५ च्या तुलनेत २०२१-२५ मध्ये ५ वर्षाखालील बालकांचा मृत्यूदर २७ वरून २३ वर आला आहे, तर अर्भक मृत्यू दर २५ वरुन २३ वर आला आहे. **मागील दहा वर्षातील मृत्यूदरामद्धे झालेली घट ही निम्न राहिलेली आहे. तो आणखी खाली आणण्यासाठी राज्याच्या आरोग्यव्यवस्था अधिक बळकट करावी लागणार आहे.**

## *राज्य अर्थव्यवस्था:*

- सन २०२४-२५च्या पूर्वमानानुसार राज्याच्या अर्थव्यवस्थेमध्ये सन २०२३-२४ च्या तुलनेत ७.३ टक्के वाढ अपेक्षित असून ती **देशपातळीवर वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेच्या (६.५ टक्के) पेक्षा ०.८ टक्क्यांनी अधिक आहे.**
- **सन २०२४-२५ मध्ये कृषी व संलग्न कार्य ७.८ टक्के, उद्योग ४.९ टक्के तर सेवा क्षेत्र ७.८ टक्क्यांनी वाढणार आहे.**
- **सन २०२४-२५ च्या पूर्वमानानुसार चालू किमती नुसार स्थूल राज्य उत्पन्न (GDP) रु. ४५ लाख ३१ हजार ५१८ कोटी इतका आहे.**
- **सन २०२३-२४ मध्ये स्थूल देशांतर्गत उत्पन्नात राज्याचा हिस्सा इतर राज्याच्या तुलनेत सर्वात जास्त १३.५ टक्के इतका आहे.**

## *राज्याची महसुली जमा व खर्च; वर्षाच्या शेवटी निधी खर्च होण्याचे प्रमाण वाढले:*

- अर्थसंकल्पीय अंदाजानुसार सन २०२४-२५ करीत राज्याची महसुली जमा रु. ४ लाख ९९ हजार ४६३ कोटी इतकी अपेक्षित आहे. तर महसुली खर्च रु. ५ लाख १९ हजार ५१४ कोटी इतका अपेक्षित आहे. **याचाच अर्थ रु. २० हजार ५१ कोटी रुपयांची महसुली तूट येणार आहे. तर राजकोषीय तूट रु. १ लाख १० हजार ३५५ कोटी इतकी येणार आहे.**
- सन २०२४-२५ मध्ये जानेवारी पर्यत रु. ३ लाख ५१ लाख १४१ कोटी महसुली खर्च झाला असून **रु. १ लाख ६७ हजार ३७३ कोटी रुपये विविध विकास कामांवर खर्च होणे बाकी असून त्यासाठी केवळ २ महीने शिल्लक आहेत; शेवटच्या २ महिन्यात ३२.२२ टक्के निधी खर्च केला जाणार आहे.** यावरून योजनांच्या अंमलबजवणीतील ढिसाळपणाची कल्पना येते.

## राज्यावर कर्जाचा भार व व्याज प्रदाने:

- **सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पीय अंदाजानुसार राज्यावर रु. ७ लाख ८२ हजार ९९१ कोटी इतक्या रक्कमेच कर्ज असून स्थूल राज्य उत्पन्नाशी तेचे प्रमाण १७.३ टक्के इतके असून व्याजापोटी रु. ५६ लाख ७२६ कोटी रुपये द्यावे लागणार आहेत.**

## राज्य शासनाने दिलेली हमी:

- **राज्याच्या विविध विभागांनी अर्थसंस्थानकडून घेतलेल्या कर्जावर राज्य शासन हमी राहिले असून वर्षअखेरीस आदत्त राहिलेली हमीची रक्कम रु. ६६ हजार ७२५ कोटी ९३ लाख इतकी आहे.**

## राज्य उत्पन्न; कृषी व उद्योग क्षेत्रातील घट ही, धोक्याची घंटा:

- सन २०११-१२ मध्ये स्थूल राज्य मूल्य वृद्धी दरात कृषी व सलग्न कार्य क्षेत्राचा वाटा १३.१ टक्के होता त्यात **२०२३-२४ मध्ये १.९० टक्के घट झाली असून ११.२० टक्क्यांवर आला आहे.**
- सन २०११-१२ मध्ये स्थूल राज्य मूल्य वृद्धी दरात उद्योग क्षेत्राचा वाटा ३५.८० टक्के होता त्यात **२०२३-२४ मध्ये १०.८० टक्के घट झाली असून तो २५ टक्क्यांवर आला आहे.**
- **सन २०११-१२ मध्ये स्थूल राज्य मूल्य वृद्धी दरात सेवा क्षेत्राचा वाटा ५१.१० टक्के होता त्यात २०२३-२४ मध्ये १२.७० टक्के वाढ झाली असून त्यावर ६३.८० टक्के झाला आहे.**

## जिल्हा उत्पन्न; विकसित जिल्हे व मागास जिल्ह्यातील आर्थिक दरी सांधण्यात सातत्याने अपयश:

- सन २०२३-२४ मधील जिल्हा दारडोई उत्पन्नाचा विचार करता मुंबईचे दरडोई उत्पन्न सर्वात जास्त रु. ४ लाख ५५ हजार ७६७ इतके असून नंदुरबार जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न सर्वात कमी असून ते रु. १ लाख २९ हजार १४६ इतके आहे. **दोन्ही जिल्ह्यामधील दरडोई उत्पन्नातील फरक रु. ३ लाख २६ हजार ६२१ (७१.६६ टक्के) इतका मोठा राहीला आहे.**

## *केंद्रीय करातील हिस्सा; महाराष्ट्राच्या तुलनेत उत्तर प्रदेश व बिहारला केंद्र सरकारचे झुकते माप:*

- सन २०२३-२४ सुधारित अंदाजनुसार केंद्र शासनाकडून सर्व राज्यांना रु. १९ लाख ९२ हजार ३३० कोटी रुपये मिळणार असून **त्यापैकी महाराष्ट्राला रु. १ लाख ५१ हजार ५६९ कोटी (७.६० टक्के) इतके अनुदान मिळणार आहे. त्या तुलनेत उत्तर प्रदेशला सर्वात जास्त रु. ३ लाख २१ हजार ३३१ कोटी (१६.१० टक्के), त्या खालोखाल बिहार या राज्याला रु. १ लाख ६९ हजार ४४५ कोटी (८.५ टक्के) इतके मिळणार आहे.**

## *लोकवित्त:*

- **सन २०२४-२५ मध्ये दरडोई राज्य उत्पन्न रु. ३ लाख ९ हजार ३४० कोटी इतका अंदाजित**
- **सन २०२३-२४ मध्ये दरडोई उत्पन्नात महाराष्ट्र ५ व्या क्रमांकावर फेकला गेला असून क्रमांक १) तेलंगणा (रु.३,५६,५६४), २) कर्नाटक (रु.३,३२,९२६), ३) तामिळनाडू (रु.३,१५,२२०), ४) गुजरात (रु. २,९७,७२२) त्यांतर ५) महाराष्ट्र (रु. २,७८,६८१) इतका आहे. दरडोई उत्पन्नाचा विचार करता, वाढत्या लोसंख्येनुसार लोकांच्या उत्पन्नाचे स्त्रोत वाढत नसल्याचे; लोकवित्त वाढत नसल्याचे निदर्शनास येते.**

## *कृषी व संलग्न कार्य; कृषी क्षेत्र घटल्याने उपलबद्ध जमिनीवरील भार वाढला:*

- कृषी गणना सन १९७०-७१ आकडेवारीनुसार राज्यातील सरासरी विहित क्षेत्र ४.२८ हेक्टर होते, ते सन २०२१-२२ च्या अस्थाई निष्कर्षानुसार १.२३ हेक्टरवर आले आहे. याचाच अर्थ **शेतीखालील क्षेत्र ३.५ हेक्टरने घटले असून हे प्रमाण ८१.७८ टक्के इतके मोठे आहे.**
- कृषी गणना सन १९७०-७१ आकडेवारीनुसार अल्प व अत्यल्प (२ हेक्टर पर्यंत) शेतकऱ्यांचे प्रमाण ५४.५ टक्के इतके होते ते सन २०२१-२२ मध्ये वाढून ८४.५ टक्क्यांवर आले आहे. याचाच अर्थ **गेल्या ५०**

**वर्षात ३० टक्क्यांनी अत्यल्प व अल्प भूधारक शेतकऱ्यांमध्ये कमालीची वाढ झाली आहे. शेतीखालील जमीन घटत असताना शेतीवरील अवलंबित्व मात्र वाढताना दिसत आहे.**

- सन २०२४ मध्ये राज्यात सरासरी ११६.८ टक्के पाऊस पडला; २०३ तालुक्यामध्ये अतिरिक्त पाऊस पडला तर ६८ तालुक्यांमध्ये अपुरा पाऊस पडला होता.
- जानेवारी ते मे, २०२४ दरम्यान अवकळी पाऊस आणि गरपिटमुळे झालेली नुकसानीची भरपाई जास्तीत जास्त तीन हेक्टर क्षेत्रासाठी मंजूर करण्यात आली असून राज्यातील ४ लाख ९५ हजार शेतकऱ्यांना २.८८ लाख हेक्टर बाधित क्षेत्रासाठी रु. ७९७ कोटी ९४ कोटींची भापाई मंजूर करण्यात आली असून सरासरी **प्रती शेतकरी ही मदत रु. १६ हजार १२० रुपये होती.**
- तर जून ते सप्टेंबर दरम्यान अतिवृष्टी आणि पुरामुळे झालेले नुकसानी ची भापाई जास्तीत जास्त तीन हेक्टर क्षेत्रासाठी मंजूर करण्यात आली असून राज्यातील ५० लाख ३६ हजार शेतकऱ्यांना ३७ लाख ६७ हजार हेक्टर बाधित क्षेत्रासाठी रु. १ हजार ४७० कोटी भरपाई मंजूर करण्यात आली असून सरासरी **प्रती शेतकरी मदत रु.२ हजार ९२१ कोटी इतकी आहे.**

## *बालकांची आरोग्य स्थिती चिंताजनकच:*

- **माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये सुमारे ६.७ टक्के (० ते ५ वर्षे वयोगटातील) बालके मध्यम कमी वजनाची आणि १.२ टक्के बालके तीव्र कमी वजनाची होती.**
- **माहे डिसेंबर, २०२४ मध्ये सुमारे ३.२४ टक्के (० ते ५ वर्ष वर्षे वयोगटातील) बालके मध्यम तीव्र कुपोषित आणि ०.७२ टक्के बालके अति तीव्र कुपोषित होती.**

## *राज्याचे हात म्हणजे शासकीय कर्मचारी यांचे वास्तव:*

- **दि**. १ जुलै, २०२३ च्या माहितीनुसार राज्यातील शासकीय कार्यालयामध्ये (स्थानिक स्वराज्य संस्था व महामंडळे वगळून) एकूण ७ लाख २४ हजार २६ (गट अ ते ड) पदे मंजूर असून त्यापैकी ४ लाख ७८ हजार ८२ पदे (६६ टक्के) भरली गेली असून **आजही २ लाख ४५ हजार ९४४ पदे (३४ टक्के) रिक्त आहेत.**

- एकूण भरलेल्या पदांमद्धे **महिला कर्मचाऱ्यांची संख्या केवळ १ लाख १२ हजार ३४९ (२३.५ टक्के)** असून आजही ही संख्या पुरुषांच्या तुलनेत कमीच आहे.
- राज्य शासकीय कार्यालयातील ४ लाख ७८ हजार ८२ कर्मचाऱ्यांपैकी **एकूण ७ हजार ११४ (१.५ टक्के) दिव्यांग आहेत.**
- राज्य शासनाची एकूण १२ हजार ६१९ कार्यालये कार्यरत असून त्यापैकी १० हजार ९४१ कार्यालये शासकीय इमारतीत कार्यरत असून **उर्वरित १ हजार ६७८ कार्यालये ही खाजगी जागेत कार्यरत आहेत. खाजगी जागेच्या भाड्यापोटी वार्षिक अंदाजे रु. १०५ कोटी ६२ लाख इतका खर्च होत असतो.**

## सामाजिक क्षेत्रांची सद्यस्थिती

### राज्यातील शाळांची संख्या घटली:

- सन २०२१-२२ ते २०२३ -२४ या तीन वर्षांत शाळांची संख्येत घट झालेली असून, सन २०२१-२२ मध्ये १ लाख ५ हजार ८४८ शाळांची नोंद झाली होती. त्या तुलनेत सन २०२२-२३ मध्ये शाळांची संख्या १ हजार ६७ ने घटली असून १ लाख ४ हजार ७८१ इतकी झाली आहे.
- सन २०२२-२३ च्या तुलनेत सन २०२३-२४ मध्ये शाळांची संख्या २८२ ने कमी होऊन १ लाख ४ हजार ४९९ एवढी झाली आहे.

### शाळेतील पटसंख्येतही मोठी घट:

- प्राथमिक ते उच्च प्राथमिक शाळेतील पटसंख्या पाहता सन २०२१-२२ मध्ये १ कोटी ५४ लाख २० हजार एवढी होती ती सन २०२३-२४ मध्ये ती संख्या ८ लाख २० हजारांनी घटली आहे.

### आजही हजारो शाळांमध्ये सोयी सुविधांची वानवाच:

- सन २०२३-२४ मध्ये राज्यातील १ लाख ४ हजार ४९९ प्राथमिक शाळांपैकी २९,०५० (२७.८० टक्के) शाळांत अद्याप संगणक सेवा पोचली नाही.

- सन २०२३-२४ १ लाख ४ हजार ४९९ प्राथमिक शाळांपैकी १३ हजार ५८४ (१३ टक्के) शाळांमध्ये खेळाचे मैदान उपलब्ध नाहीत.

## प्राथमिक पोषण शक्ती निर्माण योजना खर्च:

- प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनापोषण आहार देणाऱ्या मध्यान्ह भोजन योजनेचे २०२२ मध्ये नामकरण करून प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना असे करण्यात आले आहे. सन २०२२-२३ मध्ये योजनेचे प्राथमिक शाळेतील ५९ लाख ९५ हजार लाभार्थ्यांनी लाभ घेतला होता त्याचा खर्च ७० कोटी झाला असून प्रति विद्यार्थी तो ११६ रुपये ७६ पैसे इतका आहे.
- सन २०२३-२४ मध्ये लाभार्थी संख्येत १ लाख ३३ हजार ने वाढ होऊन ६१ लाख २८ हजार एवढ्या लाभार्थींनी लाभ घेतला असून त्या वर्षी८४४ कोटी २० लाख रुपये एवढा खर्च झाला म्हणजेच प्रत्येकी विद्यार्थ्यांमागे १ हजार ३७७ रुपये ६१ पैसे इतका झाला आहे. प्रति विद्यार्थी हा खर्च १२ पटीने वाढला आहे.

## राज्यातील आरोग्याची स्थिती भयावहच:

- आज राज्यात ३६ जिल्हे अस्तित्वात असून १७ जिल्ह्यांत अद्याप जिल्हा रुग्णालये नाहीत, तर १४ जिल्ह्यात स्त्री रुग्णालये नाहीत.
- राज्यात केवळ ५ क्षयरोग रुग्णालये उपलब्ध असून क्षयरोग रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता आणखी क्षयरोग रुग्णालये वाढणे गरजेचे आहे. त्याच बरोबर औषधांचा मोठा तुटवडा जाणवत आहे.

## महिलांवरील अत्याचारला आळा घालण्यात शासनाला अपयश:

- वर्ष २०२४ मध्ये महिलांबाबत घडलेले बलात्कार, अपहरण, हुंडाबळी, विनयभंग, अत्याचार, अनैतिक व्यापार यांसारखे ४६ हजार ४५९ गुन्ह्यांची नोंद झाली आहे. यामध्ये विनय भंग (१७,६७१) पती व

नातेवाइकांकडून झालेले अत्याचार(१०,५३९), बलात्कार(७९४०) यांसारख्या गुन्ह्यांमध्ये सातत्याने वाढ होताना दिसते.

### *बालकांचे अपहरण व पळवून नेण्याचे प्रमाण वाढले:*

- वर्ष २०२४ मध्ये बालकांवरील बलात्कार, अपहरण, व इतर गुन्ह्यांची संख्या २२ हजार ५७८ गेली असून मुलांच्या सुरक्षेसाठी पोक्सो कायदा, बाल न्याय कायदा, बाल संरक्षण युनिट्सची स्थापना, बालकल्याण समित्या, नेमलेल्या असताना देखील अंमलबजावणी तील त्रुटींमुळे गुन्ह्यांची संख्या सतत वाढत आहे.

### *पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत प्रकल्पांची संख्या घटली:*

- रोजगाराच्या संधीत वाढ करण्याच्या उद्देशाने पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम सन २००८-९ पासून राबविण्यात येत आहे. वर्ष २०२२-२३ मध्ये रोजगार निर्मितीसाठी ३ हजार ६०७ प्रकल्पांची उभारणी केली वर्ष २०२३-२४ मध्ये त्या प्रकल्प संख्येत ८८८ ने घट होऊन रोजगार प्रकल्पांची संख्या २ हजार ७२७ झाली तर २०२४-२५ मध्ये ती आणखी घातली असून डिसेंबर, २०२४ पर्यंत ती ८९७ वर आली आहे.

### *आदिवासी घटक कार्यक्रमावरील खर्च घटला:*

- सन २०२३-२४ मध्ये आदिवासी घटक कार्यक्रमांसाठी १५ हजार १०८ कोटी २२ लाख निधी प्रस्तावित केला असला तरी खर्च मात्र १३ हजार ८६५ कोटी १८ लाख झाला असून १ हजार २४३ कोटी ४ लाख रुपये अखर्चित राहिले. आखर्चित निधीचे प्रमाण ८.२३ टक्के इतके राहिले आहे.
- सन २०२४-२५ साठी १५ हजार ३६० कोटी निधी प्रस्तावित केला असून जानेवारी २०२५ पर्यंत ५ हजार २१५ कोटी १ लाख (३३.९५ टक्के) इतका खर्च झाला असून अखर्चित निधी १० हजार १४४ कोटी ९९ लाख (६६.४%) इतका आहे.


## अनुसूचित जाती घटक कार्यक्रमाच्या खर्चाला कात्री:

- सन २०२१-२२ मध्ये अनुसूचित जाती घटक कार्यक्रमासाठी ९ हजार ६६८ कोटी निधी प्रस्तापित केला असता ६ हजार ४६१ कोटी ८४ लाख निधी खर्च झाला ( ६६.८३ % ) तर ३ हजार २०६ कोटी १६ लाख निधी अखर्चित राहिला.
- २०२२-२३ मध्ये १२ हजार २३० कोटी निधी प्रस्तापित केला असला तरी प्रत्यक्ष खर्च ४ हजार ५८१ कोटी १ लाख एवढाच निधी खर्च केला असून त्याचे प्रमाण ३९.६६ टक्के इतका असून ७ हजार ६४८ कोटी ९९ लाख एवढा निधी आखर्चित राहीला असून त्याचे प्रमाण ३९.६६ टक्के इतके आहे.
- सन २०२३-२४ साठी १३ हजार ८२० कोटी निधी प्रस्तावित असताना प्रत्यक्ष खर्च मात्र १० हजार ९९८ कोटी ०९ लाख रुपये झाला आहे. म्हणजेच २ हजार ८२१ कोटी ९१ लाख रुपयांच्या खर्चाला कात्री लावली असून त्याचे प्रमाण २०.४२ टक्के इतके आहे.
- सन २०२४-२५ मध्ये १५ हजार ८९३ कोटी रुपयांचा निधी प्रस्तावित करण्यात आला असून जानेवारी २०२५ च्या अखेरी पर्यंत ५ हजार २१० कोटी ४१ लाख रुपयांचा निधी खर्च झाला असून त्याचे प्रमाण (६७.२१ टक्के) असून आखर्चित निधी १० हजार ६६२ कोटी ६० लाख रुपये इतका आहे.

***:स्रोत)**आर्थिक पाहणी २०२४ व शासकीय २५-कर्मचाऱ्यांचे सर्वंकोष माहितीकोष (२०२३ ,*

# राज्य अर्थसंकल्पाचे आकारमान

आलेख क्र. १:




| | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अर्थसंकल्पीय अंदाज | २७०७६३ | ३००३९७ | ३६७२८० | ४०३२०७ | ४३४०८४ | ४८४०९० | ५४८४०७ | ६०२००८ | ६६९४९० | ७५७५७६ |
| सुधारित अंदाज | २८२४५४ | ३२३६५२ | ३७३२३४ | ४१६९२१ | ४३७३९० | ४९६६३७ | ५८१२६८ | ६५६४९५ | ७२९२७५ | |
| प्रत्यक्ष खर्च | २५६९४२ | २८६७६८ | ३२८७३२ | ३७८६६६ | ४०१७२४ | ४३४८२५ | ५६२७१४ | ५६२७१४ | | |

*(**स्त्रोत**: वित्त विषयक विवरणपत्र, प्रत्यक्ष खर्च २०२३-२४, सुधारित अंदाज २०२४-२५, अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२६)*

- सन २०२५-२६ चा अर्थसंकल्प ७ लाख ५७ हजार ५७५ कोटी ९५ लाख रुपयांचा असून सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पाच्या सुधारित अंदाजाशी तुलना करता तो २८ हजार ३०० कोटी ४२ लाख रुपयांनी अधिक आहे.
- सन २०१६-१७ ते २०२३-२४ या कालखंडाचा विचार करता मागील ८ वर्षात एकूण सरासरी अंदाजित खर्च ४ लाख २६ हजार २८० रुपये इतका होता. परंतु या कालावधीत प्रत्यक्ष खर्च ३ लाख ९६ हजार १६१ कोटी रुपये इतका झाला. याचाच अर्थ मागील ८ वर्षातील प्रत्यक्ष खर्चात सरासरी ३० हजार ११९ कोटी रुपयांची घट झाली आहे.

# सामाजिक व सामूहिक सेवांवरील खर्चाला ३२ हजार ८१० कोटी रुपयांची सरसकट कात्री !

तक्ता क्र. १: क्षेत्र निहाय खर्च-वार्षिक कार्यक्रम २०२३-२४

| सन २०२३-२४ | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अक्र | क्षेत्र | अपेक्षित खर्च | प्रत्यक्ष खर्च | घट/वाढ | प्रमाण (%) |
| १. | कृषी व संलग्न सेवा | २३३८१.१४ | १२८१०.४० | १०५७०७४. | ४५.२१ |
| २. | ग्रामीण विकास | ८२८३.०० | ७२३५.०९ | १०४७९१. | १२.६५ |
| ३. | विशेष क्षेत्र विकास | ४२५.३० | ३१९.३० | १०६. | २४.९२ |
| ४. | पाटबंधारे व पुर नियंत्रण | १६८५०.७९ | १४८१२.१० | २०३८६९. | १२.१० |
| ५. | ऊर्जा | १६१११.२४ | १५१६९.७२ | ९४१५२. | ५.८४ |
| ६. | उद्योग व खाण | ३३२८.२१ | १४२६.५६ | १९०१६५. | ५७.१४ |
| ७. | परिवहन | ३२५४३.९४ | ३०४२६.९२ | २११७०२. | ६.५१ |
| ८. | विज्ञान, तंत्रज्ञान व पर्यावरण | ५२६.२४ | ३२१.५० | २०४७४. | ३८.९१ |
| ९. | सामान्य आर्थिक सेवा | २७१५.७४ | १८४०.५४ | ८७५२. | ३२.२३ |
| १०. | सामाजिक व सामूहिक सेवा | ११०९८७.५१ | ७८१७६.६७ | ३२८१०८४. | २९.५६ |
| ११. | सामान्य सेवा | १०४४०.२१ | ८४४६.७३ | १९९३४८. | १९.०९ |
| १२. | इतर कार्यक्रम | ६०५८.४५ | ३८४२.९१ | २२१५५४. | ३६.५७ |
| | **एकूण** | **२३१६५१.७६** | **१७४८२८.४५** | **५६८२३३१.** | **२४.५३** |


*(**स्रोत:** वार्षिक कार्यक्रम, संक्षिप्त विवरण पत्र २०२४-२५ व २०२५-२६, वित्त विभाग)*

- क्षेत्रनिहाय खर्चाचा आढावा घेता असे दिसून येते की, वर्ष २०२३-२४ मध्ये १२ क्षेत्रावरील कार्यक्रमांसाठी २ लाख ३१ हजार ६५१ कोटी ७६ लाख रुपयांचा खर्च अपेक्षित होता; त्यापैकी १ लाख ७४ हजार ८२८ कोटी ४५ लाख रुपयांचा निधी खर्च करण्यात आला. याचाच अर्थ ५६ हजार ८२३ कोटी ३१ लाख रुपयांचा (३४.५३%) निधी कमी खर्च झाला.
- सामाजिक व सामूहिक सेवा या कार्यक्रमांसाठी १ लाख १० हजार ९८७ कोटी ५१ लाख रुपयांचा निधी खर्च होणे अपेक्षित होते, त्यापैकी ७८ हजार १७६ कोटी ६७ लाख रुपयांचा निधी खर्च झाला; याचाच अर्थ ३२ हजार ८१० कोटी ८४ लाख रुपयांचा (२९.५६%) निधी कमी खर्च झाला आहे.

- कृषी व संलग्न सेवांसाठी २३ हजार ३८१ कोटी १४ लाख रुपयांचा निधी खर्च होणे अपेक्षित होते. मात्र प्रत्यक्षात १२ हजार ८१० कोटी ४० लाख रुपयांचा निधीच खर्च झाला असून १० हजार ५७० कोटी ७४ लाख रुपयांचा (४५.२१%) निधी कमी खर्च झाला.
- पाटबंधारे व पुरनियंत्रण तसेच ऊर्जा क्षेत्रासाठी अपेक्षित खर्च १६ हजार ८५० कोटी ७९ लाख रुपये होता; त्यापैकी १४ हजार ८१२ कोटी १० लाख रुपयांचा निधी खर्च करण्यात आला. म्हणजे अपेक्षित खर्चाच्या तुलनेत २ हजार ३८ कोटी ६९ लाख रुपये (१२.१०%) कमी खर्च झाले.

## मुंबई व नंदुरबार या जिल्ह्यातील आर्थिक दरी वाढली ! राज्यातील जिल्ह्यांचा होतोय; असमतोल विकास

आलेख क्र. २:




| | नंदुरबार | वाशिम | बुलढाणा | पुणे | ठाणे | मुंबई |
|---|---|---|---|---|---|---|
| दरडोई उत्पन्न २०२३-२४ | १२९१४६ | १३४७५४ | १३७२३५ | ३७४२५७ | ३९०७२६ | ४५५७६७ |


*(स्रोत: आर्थिक पाहणी २०२४-२५)*

- सर्वात कमी दरडोई उत्पन्न असलेले तीन जिल्हे नंदुरबार (रु.१,२९,१४६), वाशिम (रु.१,३४,७५४), बुलढाणा (रु.१,३७,२३५) असून पुणे (रु.३,७४,२५७), ठाणे (रु.३,९०,७२६) व मुंबई चे दरडोई उत्पन्न सर्वाधिक (रु.४,५५,७६७) इतके आहे.

- मुंबईचे दारडोई उत्पन्न ४ लाख ५५ हजार ७६७ रुपये इतके असताना त्याच वेळी नंदुरबार जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न १ लाख २९ हजार १४६ रुपये इतके आहे. दोन्ही जिल्ह्यांमधील दरडोई उत्पन्नातील फरक ३ लाख २६ हजार ६२१ रुपये एवढे मोठे आहे.
- मुंबई, ठाणे व पुणे यासारख्या महानगराचे दरडोई उत्पन्न आणि ग्रामीण दुर्गम जिल्ह्यांचे उत्पन्न हे विषमतेची प्रचंड दरी दाखविते.

## राज्यावरील कर्जाचा आलेख वाढताच !
## राज्यावरील कर्ज रु. ९ लाख ३२ हजार २४२ कोटींवर...

आलेख क्र. ३: राज्यावरील सन २०१७-१८ ते २०२५-२६ मधील कर्ज




| | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| राज्यावरील एकूण कर्ज | ४०२४२१ | ४०७१५२ | ४५१११७ | ५१९०८६ | ५७२३७९ | ६४९६९९ | ७१८५०७ | ८३९२७५ | ९३२२४२ |

*(स्रोत: वित्त विषयक विवरणपत्र, टीप अर्थसंकल्प २०२२-२३, सुधारित अंदाज २०२३-२४, अर्थसंकल्पीय अंदाज २०२४-२५)*

- सन २०२५-२६ मध्ये राज्यावर ९ लाख ३२ हजार २४२ कोटी रुपयांचे कर्ज आहे.
- सन २०२५ .कोटींचे स्थूल राज्य उत्पन्न आहे ३५५ हजार ३९ लाख ४९ मध्ये प्रचलित किमतीनुसार २६- त्या तुलनेत **राज्यावर ९ लाख ३२ हजार २४२ कोटी रुपयांचे कर्ज असून त्याचे प्रमाण १८ ८७. .टक्के इतके मोठ आहेभविष्यात ते आणखी वाढण्याची शक्यता असून ते आर्थिक शिस्तीनुसार २५ टक्क्यांच्या मर्यादेत राखणे गरजेचे आहे .**

## राज्यातील प्रत्येक नागरिकावर ७२ हजार ७६१ रुपयांचे कर्ज !

तक्ता क्र. २ : राज्याचे एकूण कर्ज, व्याज तसेच स्थूल राज्य उत्पन्न व दरडोई कर्ज:

| वर्ष | कर्ज | स्थूलराज्यउत्पन्न | कर्जाची स्थूलराज्य उत्पन्नाशी (%) | दरडोईकर्ज (रुपयात) |
|---|---|---|---|---|
| २०१७-१८ | ४,०२,४२१ | २३,५२,७८२ | १७. ११ | ३५,८०२ |
| २०१८-१९ | ४,०७,१५२ | २५,२८,८५४ | १६. १० | ३६,२२३ |
| २०१९-२० | ४,५१,११७ | २६,५७,३७१ | १६. ९८ | ४०१३५ |
| २०२०-२१ | ५,१९,०८६ | २६,२७,५४२ | १९. ८८ | ४१,७२७ |
| २०२१-२२ | ५,७६,८६८ | ३१,०८,०२२ | १८. ३५ | ४६,३७२ |
| २०२२-२३ | ६,२९,२३५ | ३६,४५,८८४ | १७. २६ | ५०,५८१ |
| २०२३-२४ | ७,१८,५०७ | ४०,५५,८४७ | १७. ७२ | ५६,३९८ |
| २०२४-२५(सु.अं.) | ८,३९,२७५ | ४५,३१,५१८ | १८.५२ | ६५,८७७ |
| २०२५-२६(अ.अं.) | ९,३२,२४२ | ४९,३९,३५५ | १८.८७ | ७२,७६१ |

*(**स्त्रोत:** संक्षिप्त अर्थसंकल्प २०२५-२६ व आर्थिक पाहणी २०२४-२५)*

- राज्य स्थूल उत्पन्नाशी कर्जाचे असलेले प्रमाण हे राज्याच्या आर्थिक स्थितीचे निदर्शक मानले जाते. वर्ष २०१७-१८ मध्ये जेव्हा युतीचे शासन होते, त्यावेळी राज्यावरील एकूण कर्ज ४ लाख २ हजार ४२१ कोटी रुपये इतके होते. त्यावेळी राज्याचे स्थूल राज्य उत्पन्न २३ लाख ५२ हजार ७८२ कोटी रुपये होते. स्थूल राज्य उत्पन्नाशी राज्याच्या एकूण कर्जाचे प्रमाण (१७.११%).
- सन २०२५-२६ मध्ये पुन्हा युतीचे असताना राज्यावरील कर्जाचा एकूण भार ९ लाख ३२ हजार २४२ कोटी रुपयांवर गेला असून, राज्य स्थूल उत्पन्न ४९ लाख ३९ हजार ३५५ कोटी रुपये इतके आहे. स्थूल राज्य उत्पन्नाशी तुलना करता, राज्यावरील एकूण कर्जाचे प्रमाण (१८. ८७%) एवढे आहे.
- राज्यातील प्रत्यक व्यक्तीवर कर्जाचा भार हा ७२ हजार ७६१ रुपये इतका आहे.

# सामाजिक विभागांच्या खर्चात ४ हजार ४७७ कोटींची कपात !

तक्ता क्र. ३:

| वर्ष २०२३-२४ (रु. कोटीत) | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **अक्र.** | **विभाग** | **अपेक्षित खर्च** | **प्रत्यक्ष खर्च** | **घट/वाढ(-/+)** | **(%)** |
| १. | शालेय शिक्षण | ७३,६६६.०४ | ७७,४२७.१३ | +३,७६१.०९ | +५.११ |
| २. | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य | २१,०९१.२१ | २०,६६८.०५ | -४२३.१६ | -२.७३ |
| ३. | आदिवासी विकास विभाग | १७,३३२.८७ | १५,३२८.०५ | -२००४.८२ | -११.५७ |
| ४. | अन्न व नागरी पुरवठा | १५,०९५.९० | १३,०४६.९५ | -२०४८.९५ | -१३.५७ |
| ५. | महिला व बाल विकास | ४,७६४.७९ | ५,४६५.०२ | +७००.२३ | +१४.७० |
| | **एकूण** | **१,३१,९५०.८१** | **१,३१,९३५.२०** | **-१५.६१** | **-०.०१** |

*(**स्त्रोत:** आर्थसंकल्पीय अंदाज, भाग-२ खर्चाचे विभागवार अर्थसंकल्पीय अंदाज वर्ष २०२४-२५ व २०२५-२६)*

- सन २०२३-२४ मध्ये सामाजिक न्याय, आदिवासी विकास विभाग व  अन्न व नागरी या ३ विभागांच्या खर्चात ४ हजार ४७६ कोटी ९३ लाख रुपयांची घट झाली असून त्याचे प्रमाण ८.३६ टक्के इतके आहे.
- शालेय शिक्षण विभागाच्या खर्चात ३ हजार ७६१ कोटी ९ लाख रुपयांची वाढ झाली असून शालेय शिक्षण विभागाच्या अपेक्षित खर्चाच्या तुलनेत ती ५.११ टक्के इतकी आहे.
- महिला व बालविकास विभागाच्या खर्चात ७०० कोटी २३ लाख रुपयांची वाढ झाली असून महिला व बालविकास विभागाच्या अपेक्षित खर्चाच्या तुलनेत ती १४.७० टक्के इतकी आहे